# पुणे महानगरपालिका
# शिवाजीनगर, पुणे ४११००५,
# महाराष्ट्र
## जाहीर आवाहन

सालाबादप्रमाणे दिनांक ३१/०८/२०२२ ते दिनांक ०९/०९/२०२२ या कालावधीत पुणे शहरात सर्वत्र सार्वजनिक गणेशोत्सव साजरा केला जाणार आहे. हा गणेशोत्सव पर्यावरणपूरकरीत्या साजरा करण्याच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेस सर्व नागरीकांनी सहकार्य करावे व महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणा-या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांत सहभागी व्हावे यासाठी आवाहन करण्यात येत आहे.

- प्लॅस्टर ऑफ पॅरीसच्या मूर्ती बनविताना, घातक रासायनिक घटकांचा वापर होतो. मूर्ती विसर्जनानंतर ही रसायने पाण्यात मिसळतात आणि पाणी प्रदूषित करतात यामुळे मासे आणि पाण्यातील इतर जीवांना धोका निर्माण होतो. त्यामुळे प्लॅस्टर ऑफ पॅरीसपासून बनविलेल्या गणेश मूर्ती ऐवजी शाडू माती व पर्यावरणपूरक पद्धतीने बनविलेल्या मूर्तीचा जास्तीत जास्त वापर करावा.
- गणेश मुर्त्यांचे विसर्जन कोणत्याही नैसर्गिक जलस्त्रोतात (नदी,तलाव) करू नये. शक्यतो आपल्या घरीच गणेश मूर्तीचे विसर्जन करावे. मूर्ती विसर्जनासाठी पुणे महानगरपालिकेमार्फत शहरातील विविध ठिकाणी कृत्रिम हौद, फिरते हौद, लोखंडी टाक्या इ.ची सोय करण्यात आली असून त्याबाबतची सविस्तर माहिती www.pmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यानुसार आपले सोयीनुसार नजीकच्या ठिकाणी मूर्ती विसर्जन करण्यात यावे.
- गणेश मूर्ती विसर्जनाऐवजी मूर्ती दान ही संकल्पना महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत असून जास्तीत जास्त नागरिकांनी मूर्ती दान करावे. यासाठी पुणे महानगरपालिकेमार्फत विविध ठिकाणी मूर्ती दान संकलन केंद्रे उभारण्यात आली असून त्याबाबतची सविस्तर माहिती वर नमूद संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- पुणे महानगरपालिका व विविध स्वयंसेवी संस्थांच्या संयुक्त विद्यमाने पुनरावर्तन हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत असून यामध्ये आपल्याकडील शाडू मातीच्या गणेश मूर्ती किंवा घरी मूर्ती विसर्जन केल्यास उरणारी शाडूचीमाती संकलित केली जाऊन त्याचा पुर्नवापर केला जाणार आहे. शाडू माती मूर्ती संकलन किंवा विसर्जन झाल्यानंतर उरलेल्या शाडूमातीचे संकलन करण्यासाठी पुणे महानगरपालिकेमार्फत उभारण्यात आलेल्या सर्व मूर्ती दान केंद्राच्या ठिकाणी सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. याव्यतीरिक्त विविध संस्थांमार्फत देखील यासाठी संकलन केंद्रे उभारण्यात आली असून त्याबाबतची सविस्तर माहिती www.punaravartan.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

- गणपती बाप्पासाठी सजावट करताना सिंगल युज प्लास्टिक व थर्माकोलच्या वस्तूंचा वापर न करता पुर्नवापर केला जाऊ शकेल अशा पर्यावरणपूरक वस्तूंचा वापर सजावटीसाठी करावा.
- आपल्या घरातून निघणारे निर्माल्य सार्वजनिक ठिकाणी किंवा नदी/तलाव याठिकाणी न टाकता महानगरपालिकेच्या यंत्रणेकडे सुपूर्त करावे. यासाठी महानगरपालिकेच्या सर्व मूर्ती संकलन/दान केंद्राच्या ठिकाणी निर्माल्य संकलनाची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. निर्माल्य वर्गीकरण करूनच देण्यात यावे व निर्माल्यामध्ये इतर प्रकारचा कोणताही कचरा येणार नाही याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे आपल्या घरातील दैनंदिन कचरा संकलनासाठी येणा-या कचरा वेचकांमार्फत सुद्धा घरातील निर्माल्य संकलनाची व्यवस्था करण्यात येणार आहे.

**(डॉ.कुणाल खेमनार)**
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ई)**
**पुणे महानगरपालिका**